O/C

कोट विद्यमान श्री. संदिप पुंडेकर, तहसिलदार, वर्धा यांचे कार्यालय

NAP-34/सेवाग्राम/07/2023-24
मौजा :- सेवाग्राम, ता., जि. वर्धा
दिनांक :- 27/02/ 2024.

संदर्भ : 1] मुख्य कार्यकारी अधिकारी तथा नियोजन प्राधिकरण, जिल्हा परिषद, वर्धा यांचे आदेश क्र. जिपव/ग्रापं/अनु.शाखा/वशि-833/2023, दि. 13/12/2023.
2] मा. जिल्हाधिकारी वर्धा यांचे पत्र क्र. अका/नझुल/कावि-62/2024, दि. 20/02/2024

अनुसूची पाच
(नियम 7 पहा)

नियोजन प्राधिका-याच्या अधिकारितेत असलेल्या जमिनीच्या धारकाला दयावयाच्या सनदेचा नमुना

ज्याअर्थी, वर्धा जिल्हयाच्या वर्धा तालुक्यातील मौजा सेवाग्राम, भु-मापन क्रमांक 87/1 व 87/2 चे भोगवटदार असलेले वर्धा, ता., जि. वर्धा येथील रहिवासी श्री. संजय पुंडलीकराव मानमोडे, श्री. गणेश परशुरामजी अतकर व श्री. मोहन पुंडलिकराव मानमोडे, रा. ज्ञानेश्वर मंदीर मागे, आर्वी नाका, वर्धा, ता., जि. वर्धा यांनी नमुद परिशिष्ट एक मध्ये वर्णन केलेला भु-मापन क्रमांक 87/1 व 87/2 चा भाग असलेल्या व आराजी अनुक्रमे 2.83 व 2.71 असे एकुण आराजी 5.54 हे.आर क्षेत्रफळ असलेला निवासी प्रयोजनासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 45 नुसार वापर करण्याच्या परवानगीकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी तथा नियोजन प्राधिकरण, जिल्हा परिषद, वर्धा यांचेकडे अर्ज सादर केला होता.

ज्याअर्थी, मुख्य कार्यकारी अधिकारी तथा नियोजन प्राधिकरण, जिल्हा परिषद, वर्धा यांनी यांचेकडील आदेश क्र. जिपव/ग्रापं/अनु.शाखा/वशि-833/2023, दि. 13/12/2023 अन्वये प्राप्त अर्जाचे अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 45 व कलम 52(2) तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 95 नुसार मौजा सेवाग्राम, ता., जि. वर्धा येथील स.नं. 87/1 व 87/2 एकुण आराजी 5.54 हे.आर क्षेत्रास रहीवासी प्रयोजनाकरीता वापर करण्याची आदेशामध्ये उक्त नमुद अटी व शर्तीचे अधीन राहून परवानगी प्रदान करण्यात आली आहे.

ज्याअर्थी, मुख्य कार्यकारी अधिकारी तथा नियोजन प्राधिकरण, जिल्हा परिषद, वर्धा यांनी यांचेकडील आदेश क्र. जिपव/ग्रापं/अनु.शाखा/वशि-833/2023, दि. 13/12/2023 मधील अट क्र. 24 मध्ये तहसिलदार वर्धा यांचेकडून सनद प्राप्त करुन घेण्याचे नमुद करण्यात आले आहे.

तहसिलदार
वर्धा

Scanned with OKEN Scanner

त्याअर्थी, आता, असे प्रमाणित करण्यात येत आहे की, महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम, 1966 अधिनियमाच्या उपबंधास अधीन राहून, आणि पुढील शर्तीवर नमुद क्षेत्र अकृषक (निवासी) प्रयोजनासाठी वापरण्याची परवानगी देण्यात येत आहे.

(1) **जमिन समतल करणे व ती साफ करणे :-** ज्यासाठी परवानगी देण्यात आली आहे, त्या विशिष्ट अकृषिक प्रयोजनास योग्य होण्यासाठी आणि आरोग्यविघातक परिस्थितीस प्रतिबंध होण्यासाठी जमीन पुरेशी समतल करण्यास व साफ करण्यास अर्जदार बांधलेला असेल.

(2) **आकारणी :-** उक्त जमीनीचा धारक उक्त जमीनीच्या संबंधात या अगोदर वसुलीयोग्य असलेल्या आकारणी ऐवजी अर्जदार शासनाला प्रत्येक वर्षी 31 जुलै रोजी संपणाऱ्या हमीच्या कालावधीत गैरकृषी (अकृषक) आकारणी रुपये 0.10 पैसे प्रती चौ.मी. प्रमाणे रूपये 2878.00/-, जिल्हा परीषद उपकर (अकृषक आकारणीचे 7 पट) रुपये 20146.00/-, ग्रामपंचायत उपकर (अकृषक आकारणीचे एक पट) रु. 2878.00/- असे एकुण रुपये 25902.00 वार्षिक आकारणी व रुपांतर कर (5 पट) रुपये 14390.00/-, (एकदा) देईल आणि उक्त कालावधी संपल्यानंतर उक्त संहिते अन्वये मा. जिल्हाधिकाऱ्यांकडुन वेळोवेळी निश्चित करण्यात येईल अशी सुधारीत आकारणी देईल.

(3) **वापर :-** अर्जदाराने **"निवासी"** अकृषक या व्यतिरिक्त असलेल्या कोणत्याही प्रयोजनासाठी जमिनीचा आणि तिच्यावर उभारलेल्या किंवा उभारावयाच्या इमारतीचा वापर **मा. जिल्हाधिकारी वर्धा याच्या** पूर्वमंजुरी शिवाय करता कामा नये.
अर्जदाराने, यासोबतच्या **परिशिष्ट-दोन** मध्ये असलेल्या शर्तीचे यथोचितरीत्या पालन केले पाहिजे.

(4) **बांधकामाबाबतची कालमर्यादा :-** अर्जदाराने या अधिकारपत्राच्या तारखेपासून तीन वर्षाच्या आत उक्त भू-खंडावर भरीव व कायम स्वरुपाचे **अकृषक** वापर सुरु केले पाहिजे, तसे न केल्यास मा. जिल्हाधिकारी वर्धा किंवा या कार्यालयाकडून वेळोवळी मुदत वाढविण्यात आली नसेल तर देण्यात आलेली परवानगी व्यपगत झाल्याचे समजण्यात येईल.

(5) **पटटी देण्याबाबतचे दायित्व :-** अर्जदाराने, उक्त जमिनीवर आकारण्याजोगे सर्व कर, पटया आणि उपकर दिले पाहिजे.

(6) **शास्तीविषयीचा खंड :-**

(अ) अर्जदाराने पूर्वगामी शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्यास, उक्त अधिनियमाच्या उपबंधान्वये अर्जदार ज्या शिक्षेस पात्र होईल अशा इतर कोणत्याही शिक्षेस बाध न आणता, **जिल्हाधिका-यास** तो निर्देशित करील अशी आकारणीची रक्कम व उक्त **अधिनियमाचे कलम** 329 **चे पोटकलम** (2) ला अधीन राहून तो निदेशित करील असा दंड भरल्यावर उक्त भू-खंड, अर्जदाराच्या ताब्यात ठेवण्याचे चालू ठेवता येईल.

(आ) **उप-खंड (अ)** मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिकारपत्राच्या उपबंधाविरुध्द कोणतीही इमारत किंवा बांधकाम उभारण्यात आल्यास किंवा वापरण्यात आल्यास **जिल्हाधिका-यांने** विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत काढून टाकण्याबाबत किंवा त्यात बदल करण्याबाबत, जिल्हाधिका-याने निदेश देणे वैध असेल आणि विनिर्दिष्ट मुदतीत अशा प्रकारे **(इमारत किंवा बांधकाम)** काढून टाकण्यात आले नाही किंवा त्यात बदल करण्यात आला नाही तर, त्याला ते काढून टाकण्याची किंवा त्यात बदल करण्याची व्यवस्था करता येईल आणि त्याबाबतचा खर्च अर्जदाराकडून जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करता येईल.

(7) **अधिनियमाचे उपबंध लागू असणे :-** यात उपबंधित केले असेल त्याव्यतिरिक्त हे अधिकारपत्र उक्त अधिनियमाच्या आणि त्याखालील नियमांच्या उपबंधास अधीन असेल.

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र जमिन महसुल (जमिनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी) नियम, 1969 मधील सर्व तरतुदी अर्जदाराला बंधनकारक राहील.

नकाशा

परिशिष्ट-एक

लांबी व रुंदी उत्तर-दक्षिण पूर्व-पश्चिम	पृष्ठभागाचे एकूण क्षेत्रफळ	सीमा उत्तर-दक्षिण पूर्व-पश्चिम
प्रकरणातील नकाशा प्रमाणे	AREA UNDER SURVEY NO. 87/1 - 28300.00 Sq.m AREA UNDER SURVEY NO. 87/2 - 27100.00 Sq.m NET AREA UNDER CONVERSION -55400.00 Sq.m (5.54 H.R.) AREA UNDER OPEN SPACE - 5545.65 Sq.m. AREA UNDER AMENITY PLOT NO. 252 - 2129.55 Sq.m AREA UNDER AMENITY PLOT NO. 253 - 3414.95 Sq.m NET AREA UNDER PLOTS - 28775.18 Sq.m AREA UNDER ROADS - 15534.67 Sq.m	प्र.सहाय्यक संचालक, नगर रचना, शाखा कार्यालय, वर्धा यांनी त्यांचे पत्र जा.क्र.अकृपक/मौ. सेवाग्राम/ता.जि.वर्धा /स.क्र.87/1,87/2/ससंनरव/1664, दि. 02/08/2023 द्वारे मंजूरीची शिफारस (Recommanded for Approval) केलेल्या प्रकरणातील नकाशा प्रमाणे

परिशिष्ट-दोन

हे अधिकारपत्र पुढील विशेष शर्तीस अधीन राहील.

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा नियोजन प्राधिकरण, जिल्हा परिषद, वर्धा यांना मंजूरी आदेश क्र. जिपव/ग्रापं/अनु.शाखा/वशि-833/2023, दि. 13/12/2023 पुर्वी खालील विभागांचे नाहरकत प्रमाणपत्र / अभिप्राय/अहवाल प्राप्त झालेले आहेत :-

1] महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मुंबई यांचे पत्र क्र. टिपीएस-2421/2033/प्र.क्र. 170/2021/नवि-9, दि. 19/10/2022.

2] जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांचे कार्यालयीन पत्र क्र. DHO/UIP/Site Insp./19- 1579/20 Date 29.09.2020.

3] ग्रामपंचायत कार्यालय, सेवाग्राम, ता., जि. वर्धा यांचे कार्यालयाचे पत्र जावक क्र.214/2020, दि. 14.12.2020.

4] प्र. सहायक संचालक, नगर रचना, शाखा कार्यालय, वर्धा यांचे पत्र जा.क्र. अकृपक/मौजा सेवाग्राम/ ता.जि. वर्धा/स.क्र.87/1,87/2/ससंनरव/1664, दि. 02/08/2023.

5] उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) वर्धा यांचे कार्यालयाचे पत्र क्र. मह. सहा/पुनर्वसन/अभिप्राय/कावि-726/2023, दि. 06/11/2023.

6] तहसिल कार्यालय, वर्धा यांचे पत्र क्र. अका/प्र.-1/कावि-1686/2023, दि. 08/11/2023.

7] कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, वर्धा यांचे कार्यालयीन पत्र जा.क्र.6352/का- 2(8)/आरें/ 2023, दि. 09/11/2023.

8] प्रभारी अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, भूसंपादन (सामान्य) यांचे कार्यालयीन पत्र क्र. अका/उजिअ/"पूसं/ प्र.अ./कावि-1213/2023, दि. 29.11.2023.

9] कार्यकारी अभियंता सं व सु विभाग, महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी मर्या., वर्धा यांचे कार्यालयीन पत्र क्र.काअ/संवसु/ वर्धा/ तांत्रीक/ 3738, दि. 19.10.2023.

Scanned with OKEN Scanner

अटी व शर्ती

1] सहाय्यक संचालक, नगर रचना, शाखा कार्यालय, वर्धा यांचे पत्र दि. 02/08/2023 मध्ये नमुद केलेल्या अटी व शर्ती अर्जदारास बंधनकारक राहतील तसेच इतर विभागाने सुचना केल्याप्रमाणे सर्व अटीचे पालन करावे लागेल.

2] अर्जदारास ज्या प्रयोजनासाठी जमिनीचा वापर करण्याची परवानगी दिलेली आहे. त्यासाठीच वापर करील आणि त्या जमिनीचा तिच्यावरील इमारतीसह वापर इतर कोणत्याही प्रायोजनासाठी करणार नाही.

3] महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम 1966 व त्याखालील नियमाच्या तरतुदीच्या अधिन राहुन परवानगी देण्यात येत आहे.

4] अर्जदाराला हा आदेश प्राप्त झाल्यापासून मंजूर केलेल्या रेखांकनातून योग्य वाटत असतील असे रस्ते, नाल्या तयार करुन त्या जमिनीचा विकास करता येईल. जमिनीचा विकास केल्याशिवाय, त्यातील भूखंडाची कोणत्याही रितीने त्याला विल्हेवाट लावता येणार नाही.

5] ज्या विभागाचे अभिप्राय प्राप्त झाले नाही ते प्राप्त करण्याची जबाबदारी अर्जदाराची राहील.

6] या आदेशानुसार दिलेली परवानगी हि अस्तित्वात असलेल्या प्रकरणांशी संबंधीत इतर अधिनियमांना म्हणजे उदा. मुंबई कुळ वहिवाट कायदा, ग्रामपंचायत अधिनियम, नगरपालिका अधिनियम व इतर संबंधीत कायदे व यामधील नियमांना व तरतुदींना अनुसरुन राहील.

7] अभिन्यासात सार्वजनिक पाणी पुरवठयाची व सांडपाण्याची प्रक्रीया करुन विल्हेवाट करण्याची व्यवस्था जमीन मालक/ विकासक यांनी स्वत:चे खर्चाने करणे आवश्यक राहील.

8] सदर शिफारस ही आवेदकाच्या मालकीच्या जागेपूरतीच मर्यादीत असून, आवेदकाच्या मालकीच्या नसलेल्या जागेचा विकास करण्याकरीता ही शिफारस लागू होणार नाही.

9] पावसाचे पाण्याचे जलसंवर्धन (RAIN WATER HARVESTING) ची व्यवस्थाअभिन्यासात करावी लागेल.

10] सदर प्रकल्पाची महारेराकडे (**Maha Rera**) नोंदणी करणे अर्जदार / विकासक यांना बंधनकारक राहील

11] महाराष्ट्र जमीन महसूल नियम 1969 (जमिनीच्या वापरातील बदल व अकृषीक कर आकारणी) च्या कलम 4 च्या अटीचे पालन करावे.

12] अर्जदार या आदेशाच्या तारखेपासून शासनाने विहीत केलेल्या प्रत्येक चौरस मिटर रुपये 0.10 पैसे या प्रमाणे जमिनीच्या संबंधातील अकृषिक आकारणीचा हमी कालावधी असून समाप्त व्हावयाच्या आहे. ही वस्तुस्थिती विचारात न घेता वेगवेगळया दराने अकृषिक आकारणी वसूल करणेत येईल.

12] अर्जदार यांनी म.रा.वि.मं.आ.इ नियम (79)1956 प्रमाणे वीज तारेवाबत योग्य अंतर ठेवावे लागेले.

14] अर्जदारांवर भारतीय वीज नियम बंधनकारक राहतील. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, वर्धा यांचेकडील ना हरकत दाखला उपलब्ध करुन घेणे व त्यातील सर्व अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहतील.

15] प्रस्तुत रेखांकनाखाली क्षेत्रास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 मधील तरतूदीनुसार व त्यामध्ये झालेल्या सुधारणानुसार विकास आकार भरणे अर्जदारावर बंधनकारक राहील.

16] अभिन्यासातील भुखंडाचे आंतर विभाजन करण्यांत येवू नये. भूखंडाचे विभाजन अथवा एकत्रिकरण करण्याकरीता सक्षम अधिकारी यांची नियमानुसार परवानगी घेणे बंधनकारक राहील.

17] अकृषक परवानगीचे आदेश पारीत झाल्याचे तारखेपासून अभिन्यासात दशविलेली मोकळी जागा (Open Space) ही व्यवस्थापनाकरीता संबंधीत ग्रामपंचायत किंवा स्वराज्य संस्थेकडे यांचेकडे सार्वजनिक उपयोगाकरीता विहीत करण्यात येत असून जमीनधारकाने अथवा इतर कोणीही या जागेची विक्री केल्यास महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 अंतर्गत दंडनिय कार्यवाही करण्यात येईल तसेच फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल.

18] रेखांकनाची जागेवर प्रत्यक्ष आखणी झाल्यानंतर त्यातील रस्ते, आजुबाजूच्या जमीनीतील रेखांकने मंजूर झालेली असतील तर त्यातील रस्त्याचा समन्वय (को-ऑर्डीनेशन) उपअधिक्षक, भुमी अभिलेख यांचेअभिलेखाप्रमाणे साधने आवश्यक आहे.

Scanned with OKEN Scanner

19] रेखांकनातील रस्ते हे सर्वांना वापरण्यासाठी खुले राहतील व ते सार्वजनिक जाण्या-येण्याचा मार्ग म्हणून उपयोगात व वापरात राहतील.

20] रेखांकनातील कोणत्याही भूखंडामध्ये बांधकाम करण्यापूर्वी त्याबाबतचे सविस्तर बांधकाम नकाशे अंतिम रेखांकनासह शासनाच्या ग्रामविकास विभागकडील निर्णय क्र. व्हीपीएम- 2015/प्र.क्र.39/पं.स.4., दिनाक 11 डिसेंबर, 2015 मध्ये नमुद केल्याप्रमाणे सक्षम प्राधिकरणा मार्फत सादर करुन मंजूर करुन घेण्यात यावे. त्याशिवाय बांधकामास सुरुवात करु नये.

21] अर्जदारांवर दी एक्टचे नियम बंधनकारक राहतील तसेच रेखांकन हद्दीतील विकास करताना कोणत्याही प्रकारची झाडे तोडली जाणार नाहीत याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

22] सेवा रस्ता / इमारत रेषा / नियंत्रण रेषा इत्यादीबाबत महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे शासन निर्णय क्र. आरबीडी-1081/871 रस्ते-7, दि. 09 मार्च, 2001 व त्यानंतरची उक्त संदर्भातिल वेळोवेळी निर्गमित झालेल्या परिपत्रकामधील अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

23] सह हिस्सेदार यांचे सन्मती पत्र व प्रस्तावीत रेखांकनामध्ये दर्शविलेल्या अर्जदार यांच्या जमिनीच्या मालकी हक्काबाबत/हद्दीतील काही कायदेशीर बाबी उद्भवल्यास त्यास अर्जदार स्वत:जबाबदार राहील आणि त्यांचे निराकारक अर्जदाराने परस्पर स्वखर्चाने करावयाचे आहे.

24] वेळोवेळी शासनाने ठरविलेल्या अकृषक आकारणीचा भरणा करणे अर्जदाराला बंधनकारक राहील.

25] अभिन्यासातील पोच रस्ते, अंतर्गत रस्ते, नाली, पाण्याची व्यवस्था, कल्व्हेट, पुल, रस्त्याचे बाजूस विजेचे पोल व इतर आवश्यक सार्वजनिक सुविधा विकसीत करणे आवेदकावर बंधनकारक राहील.

26] याअभिन्यासातील भूखंडांची विक्री करतांना अकृषक आदेश व मंजूरअभिन्यास नकाशा जोडणे बंधनकारक राहील तसेच तो विक्रीपत्राचा एक भाग समजण्यात येईल.

27] जागेचे मालकी हक्क अभिन्यासाच्या हदी व क्षेत्रफळाबाबत तसेच पोच रस्याबाबत काही वाद उपस्थित झाल्यास ही शिफारस रदद समजण्यात येईल. उपरोक्त अकृषक जमीनीवरील 1ऑगस्ट पासुन सुरु होणाऱ्या दर वर्षाला नियमानुसार अकृषक कर व त्यावरील प्रचलित दरानुसार जिल्हा परिषद सेस व ग्रामपंचायत सेस वसुल केल्या जाईल. वरील कराची आकारणी नगर रचनाकार वर्धा यांनी अनुमोदीत करुन दिलेल्या अभिन्यासानुसार राहील.

28] उपरोक्त नमूदअटी व शर्ती शिवाय शासनाचे वेळोवेळी लागू केलेले सर्व नियम वअटी अर्जदार यांना बंधनकारक राहील.

29] कोणतेही वेळी आढळून आले की, अर्जदार यांनी चुकीची अथवा दिशाभुल करणारी माहिती दिलेली असेल तर दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल.

या गोष्टीची साक्ष म्हणून मा. जिल्हाधिकारी वर्धा यांन संदर्भ क्र. 02 अन्वये प्राप्त आदेशानुसार तहसिलदार वर्धा यांनी महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या वतीने आपली सही केली आहे आणि आपल्या पदाची मोहोर लावली आहे आणि अर्जदाराने सुध्दा यावर आज दिनांक 12/ 2 /2024 रोजी सही केली आहे.

तहसिलदार वर्धा

(संदिप पुंडेकर)
तहसिलदार वर्धा

(संजय पुं. मानमोडे)

(गणेश प. अतकर)

(मोहन पुं. मानमोडे)

Scanned with OKEN Scanner

आम्ही असे जाहीर करतो, की जिने या सनदेवर सही केली आहे, ते श्री. संजय पुंडलीकराव मानमोडे, श्री. गणेश परशुरामजी अतकर व श्री. मोहन पुंडलिकराव मानमोडे या व्यक्ती आमच्या वैयक्तिक माहीतीप्रमाणे तो जो व्यक्ती असल्याचे म्हणत आहे तीच व्यक्ती आहे आणि तिने आमच्या समक्ष आपली सही केली आहे.

(साक्षीदाराचे नाव व स्वाक्षऱ्या)

1] विजय श्रीराम चोपडे

2] विवेक भगवंतराव पाटील

प्रतिलिपी :-

1] मा. जिल्हाधिकारी, वर्धा यांना संदर्भ क्र. 01 व 02 चे अनुषंगाने माहितीकरीता सविनय सादर.
2] मा. नियोजन प्राधिकरण अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांना माहिती व उचित कार्यवाहीस्तव सादर.
3] मा. उपविभागीय अधिकारी, वर्धा यांना संदर्भ क्र. 01 व 02 चे अनुषंगाने माहितीकरीता सविनय सादर.
4] सहायक संचालक, नगर रचना, शाखा कार्यालय, वर्धा यांना माहिती व उचित कार्यवाहीस्तव.
5] उप अधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, वर्धा यांना उचीत कार्यवाहीस्तव अग्रेषित.
6] सहा. दुय्यम निबंधक, वर्धा यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित.
7] मंडळ अधिकारी सेवाग्राम, ता., जि. वर्धा यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित.
8] तलाठी सेवाग्राम, ता., जि. वर्धा यांना माहिती तथा महसूली अभिलेख अद्यावत करण्यास तसेच आदेशाचे अनुषंगाने कार्यवाहीस्तव अग्रेषित.
9] वर्क लोड पटवारी, तहसिल कार्यालय, वर्धा यांना सदर आदेशाची नोंद तालुका नमुना-2 मध्ये घेण्यास अग्रेपित.
10] अर्जदार श्री. संजय पुंडलीकराव मानमोडे, श्री. गणेश परशुरामजी अतकर व श्री. मोहन पुंडलिकराव मानमोडे, रा. ज्ञानेश्वर मंदीर मागे, आर्वी नाका, वर्धा, तह., जि. वर्धा यांना माहिती तथा उचित कार्यवाहीकरीता अग्रेषित.
11] कार्यालयीन प्रत.

(संदिप पुंडेकर)
तहसिलदार वर्धा

Rcvd on 28/02/2024

सह दुय्यम निबंधक, वर्ग-२,
वर्धा

प्राप्त दि. 4/3/2024
लिपीक
ग्रामपंचायत सेवाग्राम

01/03/2024

भुखंडाचा तपशील

अ. क्र.	भूखंड क्रमांक	एकुण भुखंड	भूखंडाचे क्षेत्र (चौ.मी.)	भूखंडाचे एकुण क्षेत्र (चौ.मी.)	भूखंडा निहाय अकृषक सारा (रु.पैसे)
1	1	1	99.23	99.23	10
2	2	1	101.68	101.68	10
3	3	1	104.30	104.30	10
4	4	1	114.66	114.66	11
5	5	1	139.51	139.51	14
6	6 To 17	12	120.90	1450.80	12
7	18	1	129.43	129.43	13
8	19	1	145.70	145.70	15
9	20 To 31	12	120.90	1450.80	12
10	32	1	141.20	141.20	14
11	33	1	117.95	117.95	12
12	34 To 36	3	108.50	325.50	11
13	37	1	130.50	130.50	13
14	38 To 42	5	116.25	581.25	12
15	43	1	117.95	117.95	12
16	44	1	148.95	148.95	15
17	45 To 52	8	114.70	917.60	11
18	53 To 54	2	135.15	270.30	14
19	55 To 62	8	114.70	917.60	11
20	63	1	148.95	148.95	15
21	64	1	117.95	117.95	12
22	65 To 69	5	116.25	581.25	12
23	70	1	152.20	152.20	15
24	71	1	134.38	134.38	13
25	72 To 76	5	124.00	620.00	12
26	77	1	125.70	125.70	13
27	78	1	117.95	117.95	12
28	79 To 100	22	111.60	2455.20	11
29	101	1	117.95	117.95	12
30	102	1	125.70	125.70	13

Scanned with OKEN Scanner

31	103 To 107	5	124.00	620.00	12
32	108	1	152.20	152.20	15
33	109	1	139.88	139.88	14
34	110	1	113.10	113.10	11
35	111	1	113.10	113.10	11
36	112	1	116.58	116.58	12
37	113	1	127.03	127.03	13
38	114	1	116.15	116.15	12
39	115	1	116.58	116.58	12
40	116	1	117.45	117.45	12
41	117	1	119.63	119.63	12
42	118	1	123.11	123.11	12
43	119	1	159.45	159.45	16
44	120	1	127.93	127.93	13
45	121	1	99.05	99.05	10
46	122	1	97.30	97.30	10
47	123	1	95.90	95.90	10
48	124	1	98.33	98.33	10
49	125	1	130.50	130.50	13
50	126 To 131	6	111.60	669.60	11
51	132	1	125.70	125.70	13
52	133 To 143	11	113.15	1244.65	11
53	144	1	120.51	120.51	12
54	145	1	135.24	135.24	14
55	146 To 156	11	113.15	1244.65	11
56	157	1	125.70	125.70	13
57	158 To 163	6	111.60	669.60	11
58	164	1	145.23	145.23	15
59	165	1	126.35	126.35	13
60	166 To 174	9	105.00	945.00	11
61	175	1	112.95	112.95	11
62	176	1	114.35	114.35	11
63	177 To 190	14	100.80	1411.20	10

Scanned with OKEN Scanner

64	191	1	154.00	154.00	15
65	192	1	118.30	118.30	12
66	193 To 206	14	100.80	1411.20	10
67	207	1	114.35	114.35	11
68	208	1	112.95	112.95	11
69	209 To 215	7	105.00	735.00	11
70	216	1	107.63	107.63	11
71	217	1	112.69	112.69	11
72	218	1	156.53	156.53	16
73	219	1	124.72	124.72	12
74	220	1	94.50	94.50	9
75	221	1	98.82	98.82	10
76	222 To 228	7	100.80	705.60	10
77	229 To 230	2	122.75	245.50	12
78	231 To 239	9	100.80	907.20	10
79	240	1	113.40	113.40	11
80	241	1	140.39	140.39	14
81	242	1	100.10	100.10	10
82	243	1	105.70	105.70	11
83	244	1	111.65	111.65	11
84	245	1	117.95	117.95	12
85	246	1	124.08	124.08	12
86	247	1	130.38	130.38	13
87	248	1	136.85	136.85	14
88	249	1	143.50	143.50	14
89	250	1	136.95	136.95	14
90	251	1	139.10	139.10	14
एकुण भुखंडांची संख्या-251			10888.08	28775.18	

Scanned with OKEN Scanner

[illegible]
Sanjay Pundlikrao Manmode
जन्म वर्ष / Year of Birth : 1969
पुरुष / Male

9390 6977 1600

आधार – सामान्य माणसाचा अधिकार

Manmode

भारत सरकार
Government of India

गणेश परशुरामजी अटकर
Ganesh Parshuramji Atkar
जन्म तारीख / DOB: 23/08/1967
पुरुष / Male

2252 9748 8066

मेरा आधार, मेरी पहचान

GPAtkar

भारत सरकार
Government of India

Download Date: 04.06.20..

मोहन पुंडलिकराव मानमोडे
Mohan Pundlikrao Manmode
जन्म तिथि/DOB: 10/09/1971
पुरुष/ MALE

Issue Date: 02.06.2019

4424 4641 1836
VID : 9140 4276 9167 9878

मेरा आधार, मेरी पहचान

Mop. Mod.

भारत सरकार
Government of India

विवेक भगवंतराव पाटील
Vivek Bhagvantrao Patil

जन्म तिथि/DOB: 24/12/1985
पुरुष / Male

2868 1492 4426

आधार - आम आदमी का अधिकार

विवेक पाटील

भारत सरकार
Government of India

विजय श्रीरामजी चोपडे
Vijay Shriramji Chopade
जन्म तारीख / DOB: 04/08/1977
पुरुष / MALE

4073 0394 5498

VChopade